DIS/1013639/2025

श्री.गोविंद विष्णू नागरगोजे, बडतर्फ प्राथमिक शिक्षक यांना जिल्हा परिषद सेवेत पदस्थापना देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
शिक्षण विभाग प्राथमिक
कार्या२/खाचौद/८०६/२०२५
अहिल्यानगर दि.२९/०८/२०२५
(खाली नमुद प्रमाणे)

वाचा:- १.पोलीस उपनिरिक्षक कुडाळ यांचे पत्र क्र.६०४४/२०१६ दि.०९/०९/२०१६
२. या कार्यालयाकडील पत्र निलंबन आदेश क्र.कार्या१/पी.बी.एस./४६६/१६ दि.१७/०९/२०१६
३.विभागीय चौकशी अधिकारी यांचे कडील विभागीय चौकशी अहवाल क्र.९८/२०१८ दि.२४/०४/२०१८
४.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.कार्या२/खाचौद/१४०/२०१९ दि.०२/०३/२०१९
५. या कार्यालयाचा आदेश क्र.कार्या२/खाचौद/५५४/२०१९ दि ०२/०७/२०१९
६.मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कुडाळ यांचेकडील नियमित फौजदारी खटला क्र.४४/२०१७ चे दि.२९/०९/२०२४ चा निर्णय
७.मा.अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे अपील निर्णय क्र.१६/२०२५ दि.१४/०८/२०२५
८.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ४ चे नियम २२

श्री.गोविंद विष्णु नागरगोजे हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जावळेवस्ती (पोखर्डी) ता.जि.अहिल्यानगर येथे प्राथमिक शिक्षक पदावर कार्यरत असताना त्यांचे विरुद्ध कुडाळ पोलीस स्टेशन येथे दि.२८/०८/२०१६ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या कर सहाय्यक या पदाचे परिक्षेमध्ये डमी विद्यार्थी बनुन परिक्षा देत असले कारणाने त्यांचे विरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४१९,४६५,४६८,४७१ व महाराष्ट्र विद्यापिठाच्या, मंडळाच्या व इतर विर्निदिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरव्यवहारांना प्रतिबंध अधिनियम १९८२ कलम ७.८ अन्वये गुन्हा दाखल होवून अटक करण्यात आलेली होती.सदर गुन्हयात श्री. नागरगोजे याना दिनांक २८/०८/२०१६ रोजी अटक करण्यांत आलेली असून दिनांक ०२/०९/२०१६ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड घेण्यांत आलेली आहे. सदरचा कालावधी ४८ तासापेक्षा जास्त असले कारणाने या कार्यालयाचे दि.१७/०९/२०१६ चे आदेशान्वये जिल्हा परिषद सेवेतून तात्पुरते दूर केलेले होते.

प्रकरणी श्री.गोविंद विष्णु नागरगोजे यांचे या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्रमांक कार्या२/खातैचौकशी/५०/२०१७,दिनांक १२/०१/२०१७ अन्वये आपणांस बजाविणेत आलेलो होते. श्री.नागरगोजे यांनी दिनांक ३१/०७/२०१७ चे खुलाशाने दोषारोप नाकबुल केलेने त्यांचे विरुद्धचे दोषारोपांची चौकशी करणेसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ अन्वये विभागीय चौकशी अधिकारी म्हणून श्री.अ.म.देशमुख,वैज्ञानिक संशोधन अधिकारी (से.नि.) यांची या कार्यालयाकडील आदेश क्रमांक कार्या२ / खातेचौकशी / ९३१/२०१७, दिनांक ०४/१०/२०१७ अन्वये नेमणुक करणेत आलेली होती. चौकशी अधिकारी यांनी त्यांचेकडील चौकशी अहवाल क्रमांक १३/२०१८,दिनांक १४/०५/२०१८ अन्वये इकडील कार्यालयास सादर केलेला आहे. श्री.नागरगोजे हे १ ते ४ दोषारोपातील विभागीय चौकशी अधिका-यांचे निष्कर्षानुसार श्री.गोविंद विष्णू नागरगोजे, प्राथमिक शिक्षक, जि.प.प्रा.शा,

जावळेवस्ती, ता.व जि.अहमदनगर हे या दोषारोपावबत दोषी आढळून आलेले आहेत. त्यामुळे त्यांचे विरुद्ध ठेवण्यांत आलेले दोषारोप सिध्द होत असले कारणाने त्यांना या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ५ चे आदेशान्वये वडतर्फ करण्याची शास्ती अंतिम करण्यात आलेली आहे.

करिता सदर आदेशाने व्यथित होऊन श्री.गोविंद विष्णु नागरगोजे यांनी अपर आयुक्त नाशिक यांचेकडेस अपील क्र.१६/२०२५ दाखल केले आहे. प्रकरणी सदर अपीलाचा निर्णय संदर्भ ७ नुसार दि.१४/०८/२०२५ नुसार झालेला असून सदरचे निर्णयानुसार या कार्यालयाचा आदेश क्र.कार्या२/खाचौद/५५४/२०१९ दि.०२/०७/२०१९ हा वडतर्फीचा आदेश रद्द करण्यात आलेला आहे.

करिता श्री.गोविंद विष्णु नागरगोजे यांना जि.प.प्राथ.शाळा ....मारजवाडी.... ता....पाथर्डी....
जि.अहिल्यानगर येथे पदस्थापना देण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोद श्री.गोविंद विष्णु नागरगोजे यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी

सदरचा आदेश जिल्हा परिषद अहिल्यानगरचे www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा सांकेतांक 20250929160999. असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-09-2025 16:09:44
(आनंद भंडारी, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

श्री.गोविंद विष्णु नागरगोजे, मु.पो. तिंतरवनी, ता.शिरुर जि.बीड

प्रत :-कार्यवाहीस्तव गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर

२/- सदर आदेशाची नोंद श्री.गोविंद विष्णु नागरगोजे यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात येऊन त्यांना पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणे कामी कार्यमुक्त करण्यात यावे.

प्रत :-गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती ....पाथर्डी.......

प्रत :- गटविकास अधिकारी पंचायत समिती ....पाथर्डी.....

स्वाक्षरीत /-
(आनंद भंडारी, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर